साप्ताहिक

# गोदावरी

परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24

* वर्ष २५ वे * अंक ४६ * सोमवार ११/११/२०२४ * डाक १३/११/२०२४ * पाने - ४ * किंमत २ रुपये

* year 25 * issue 46 * monday : 11 / 11 / 2024 * post Dt. 13/ 11 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.



दि. १५ नोव्हें. : गुरुनानक जयंती







# गोदावरी परिवारातील लक्ष्मीच्या हस्ते लक्ष्मीपूजन

**जळगाव – गोदावरी परिवारातील लक्ष्मी असलेल्या डॉ. अक्षता पाटील आणि डॉ. अनिकेत पाटील या नवदाम्पत्याच्या हस्ते डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या अन्नपूर्णालयम् येथे लक्ष्मीपूजन करण्यात आले. यावेळी डॉ. अक्षता पाटील यांचा वाढदिवसही मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.**

गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील व सचिव डॉ. वर्षा पाटील यांच्या स्नुषा सौ. डॉ. अक्षता पाटील आणि श्री. डॉ. अनिकेत पाटील यांच्या हस्ते लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अन्नपूर्णालयम् येथे आयोजित या कार्यक्रमाला गोदावरी परिवाराच्या आधारस्तंभ गोदावरी आजी, फाउंडेशनचे उपाध्यक्ष सुभाष पाटील, प्रा.डॉ. सुषमा पाटील, सौरभ पाटील, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. वैभव पाटील, अनिल पाटील, सौ. अलका पाटील, आदी उपस्थित होते. राजपुरोहीत तथा अन्नपुर्णालयमचे संचालक डी.टी. राव यांच्या वेदमंत्रोच्चारात डॉ. अनिकेत पाटील आणि सौ. डॉ. अक्षता पाटील यांच्या हस्ते लक्ष्मीची पूजा करण्यात आली. त्यानंतर वाढदिवसानिमीत्त सौ. डॉ. अक्षता पाटील यांच्या हस्ते केक कापण्यात आला. याप्रसंगी अन्नपूर्णालयम् मधील सर्व सहकाऱ्यांसह ज्येष्ठांनी सौ. डॉ. अक्षता पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



## अन्नपूर्णालयम येथे वाढदिवसही जल्लोषात साजरा

**डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातही दिवाळी साजरी**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातही दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रूग्णालयातील कर्मचाऱ्यांनी एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छाही दिल्या. यावेळी नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आकर्षक रांगोळी साकारली होती. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमकुमार पंडीत यांच्या उपस्थितीत दिवाळी साजरी करण्यात आली.

**विवरे येथील जुन्या घरी उजळल्या आठवणी**

माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांचे विवरे गावातील मुळ निवासस्थानी पाटील कुटुंबियांनी भेट दिली. यावेळी डॉ. उल्हास पाटील यांच्यासह डॉ. वर्षा पाटील, डॉ. अनिकेत पाटील, डॉ. अक्षता पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. उल्हास पाटील यांनी जुन्या निवासस्थानाविषयीच्या आठवणींना उजाळा दिला.







# जुळ्यांमधील एकाला काविळ, दुसऱ्याचे वजन कमी तरीही वाचले प्राण

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील नवजात शिशु तज्ज्ञांकडून यशस्वी उपचार

**जळगाव – महिला रूग्णाला प्रसूतीनंतर झालेल्या जुळ्यांमधील एका शिशुचे वजन अत्यंत कमी होते आणि दुसऱ्या शिशुला प्रचंड प्रमाणात कावीळ होता. अशा जोखमीच्या परिस्थितीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील नवजात शिशु तज्ज्ञांनी कौशल्य पणाला लावत दोन्ही शिशुवर केलेल्या उपचारामुळे त्यांचे प्राण वाचले.**

याबाबत माहिती अशी की, भुसावळ येथील जंजाळ कुटूंबातील महिलेची डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात प्रसूती झाली. प्रसूतीनंतर जुळे शिशु जन्माला आले. जुळे झाल्याने त्यांच्या कुटुंबाचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. परंतु जन्मत:च एका शिशुचे वजन कमी होते आणि दुसऱ्या शिशुचे कावीळचे प्रमाण अधिक वाढले होते. परिस्थिती जिकरीची निर्माण झाल्यावर दोन्ही शिशुंना तातडीने डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या नवजात शिशु अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

याठिकाणी नवजात शिशु तज्ज्ञ डॉ. सुयोग तन्नीरवार यांनी दोन्ही शिशुंची तपासणी केली. तपासणीत एका शिशुचे वजन एक किलो ७०० ग्रॅम होते आणि दुसऱ्या शिशुला कावीळ मोठ्या प्रमाणात होता. अशा परिस्थितीत डॉ. तन्नीरवार यांनी दोन्ही शिशुंवर तातडीने उपचार सुरू केले. अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) भरती करून दोन्ही शिशुंच्या प्रत्येक हालचालीवर क्षणाक्षणाला लक्ष ठेवण्यात आले. अनुभव आणि कौशल्याच्या बळावर डॉ. सुयोग तन्नीरवार यांनी केलेल्या उपचाराला यश आल्याने दोन्ही शिशुंच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होऊन त्यांचे प्राण वाचले.

जुळे झालेल्या दोन्ही शिशुंचे प्राण वाचल्याने जंजाळ कुटूंबियांनी डॉक्टरांना अक्षरश: देवदूतच म्हणून संबोधले. उपचारासाठी डॉ. ओमश्री गुडे, डॉ. कुशल धांडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर, सहाय्यक हिरामण पाटील यांनी सहकार्य केले.



रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

महिलेची वेळेआधीच प्रसूती झाल्यास शिशुंमध्ये त्याचा परिणाम दिसून येतो. अशा शिशुंवर काळजीपूर्वक उपचार करणे आवश्यक असते. त्यांच्या प्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या एनआयसीयूमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधा आणि तज्ज्ञांकडून करण्यात आलेल्या उपचारामुळे नवजात शिशुंचे प्राण वाचले.



–डॉ.ओमश्री गुडे
निवासी डॉक्टर

## संपादकीय

# समृध्दी प्राप्तीची कामना

लक्ष्मीचे पूजन म्हणजे समृद्धीचे पूजन. ती तर गरजेची आहेच. म्हणूनच कदाचित लक्ष्मीप्राप्तीसाठी माणसे त्यांचे आयुष्य वेळापत्रकाशी बांधून घेतात. तथापि भौतिक सुखसुविधांची प्राप्ती म्हणजेच समृद्धता मानली जाते. पण ते योग्य म्हटले जाऊ शकेल का? त्यापलीकडेही माणसाचे आयुष्य असते. ते आनंदाने जगण्यासाठी अनेक प्रकारची समृद्धतादेखील आवश्यक नसते का? नात्यांची, मनाची, शारीरिक आणि मानसिक आरोग्याची समृद्धता माणसांचे आयुष्य समृद्ध करण्यात मोलाची भूमिका बजावते. मन अशांत असले, आरोग्य बिघडलेले असले, नाती विस्कटलेली असली तर केवळ आर्थिक समृद्धता माणसांना आनंदाची आणि समाधानाची प्राप्ती करून देऊ शकेल का? ज्याने त्याने वैयक्तिक पातळीवर या प्रश्नाचे उत्तर शोधले तरी त्याचे वैश्विक उत्तर नक्कीच 'नाही' हे असू शकेल. नात्यांची, मनाची, शारीरिक आणि मानसिक आरोग्याची समृद्धता कशी राखायची हे समजून घेण्याची सुरुवात या दिवाळीच्या निमित्ताने केली जाऊ शकेल. या विविध प्रकारच्या समृद्धता प्राप्तीसाठी तिचे सिंचन करणे गरजेचे आहे. अहंकाराचा त्याग, विनयशीलता, आदर, नम्रता, एकमेकांना क्षमा करण्याची तयारी, संवादासाठी तत्परता, बदल स्वीकारण्याची तयारी, आपुलकीची उधळण, स्नेहाची पखरण, बिनशर्त प्रेम करणे यांचे सिंचन उपरोक्त समृद्धीप्राप्तीचा पाया ठरू शकेल. तीच शाश्वत सुख आणि समाधान प्राप्त करून देऊ शकेल. खरे तर हे सगळे गुण मानवी स्वभावात अंतर्भूतच नसतात का? सगळेच कधी ना कधी लहान मूल असतात. देवाघरचे फूल असे लहान मुलाचे वर्णन केले जाते. कारण त्याचे निर्मळ मन. वाढत्या वयाबरोबर त्या मनावर विविध पुटे माणसेच चढवतात. तीच पुटे मग विविध प्रकारच्या समृद्धीप्राप्तीतील अडथळा बनतात. हा प्रवास कसा आणि कधी होतो ते माणसाच्या लक्षातसुद्धा येत नाही. ती पुटे काढून टाकण्याची सुरुवात यावर्षीपासून केली जाऊ शकेल. विचारांमध्ये, नात्यांमध्ये, आचारात पारदर्शकता राखली आणि जगणे सरळ सोपे ठेवले तर जगण्याचे गाणे होऊ शकेल. तेव्हा विविध प्रकारच्या समृद्धीच्या प्राप्तीचीदेखील आज कामना करूया.

# लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

## भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे जळगाव विभागाचा उपक्रम; रांगोळी स्पर्धा, ज्येष्ठांचा सत्कार



**जळगाव – भोरगाव लेवा पाटीदार पंचायत ठाया पाडळसे जळगाव विभाग व सकल लेवा पाटीदार समाज व सरदार वल्लभभाई पटेल बहुउद्देशीय विकास संस्था जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १४९ व्या जयंती निमित्त माल्यार्पण, रांगोळी स्पर्धा बक्षीस वितरण व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.**

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खासदार तथा अध्यक्ष भोरगाव पंचायत ठाया पाडळसा डॉ. उल्हास पाटील तसेच प्रमुख पाहुणे म्हणून ललित रमेश पाटील कुटुंबनायक भोरगाव पंचायत ठाया पाडळसा, डॉ. ए जी भंगाळे माजी अध्यक्ष आयएमए जळगाव, विष्णू भंगाळे विभागीय प्रमुख भोरगाव पंचायत जळगाव विभाग, सदस्य भोरगाव पंचायत ठाया पाडळसा सौ. नीलाताई चौधरी प्रकल्प प्रमुख रांगोळी स्पर्धा, सदस्य भोरगाव पंचायत जळगाव विभाग, डॉ. स्नेहल फेकडे, डॉ. प्रशांत वारके प्रदीप रोटे, प्रकाश वराडे, मधुकर भंगाळे, प्रदीप भोळे सदस्य भोरगाव पंचायत जळगाव विभाग नीताताई वराडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी उपपंतप्रधान लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्यास व मा. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिक श्री निंबाजी कृष्णा चौधरी शेती, श्री डॉ मुरलीधर कौतिक भंगाळे वैद्यकीय अधिकारी, श्री भानुदास धर्मा भोळे कृषी अधिकारी, श्री हरी पांडुरंग पाटील माजी सरपंच सुनसगाव, श्री रामदास गणपत भंगाळे माजी सरपंच वाघळी, श्री दत्तात्रय तुकाराम चौधरी असिस्टंट कमिशनर ऑफ पोलीस, फेजस्कॉन ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष, श्री जगन्नाथ कौतिक येवले माजी हवाई दल, ह भ प सुखदेव भिवसन राणे भागवत कथाकार, श्री काशिनाथ तुकाराम ब-हाटे सेवा निवृत्त शिक्षक, श्री मधुकर भिकाजी चौधरी सेवा निवृत्त शिक्षक, श्री पी के पाटील कृषी अधिकारी, श्री गजानन गोविंदा पाटील माजी सैनिक श्री रवींद्र त्रंबक भारंबे माजी सैनिक या सरकारी तसेच खाजगी सेवेतून निवृत्त झालेले लेवा सरदार ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

रांगोळी स्पर्धा दि. ३० ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात आली सदर स्पर्धेत विजेते माधुरी हितेश बारी प्रथम क्रमांक, विद्या विशाल टेकावडे द्वितीय क्रमांक, ईश्वरी उदय सोनवणे तृतीय क्रमांक दिव्या उमेश खांबेटे उत्तेजनार्थ यांना प्रमाणपत्र व रोख रक्कम बक्षीस व सहभाग घेणाऱ्या प्रत्येकाला भेट वस्तू व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आले देण्यात आले प्रियंका महेश दंडगव्हाळ यांनी परीक्षक म्हणून काम केले. विद्या टेकावडे या कर्णबधिर विद्यार्थिनीने सुई दोऱ्याच्या माध्यमातून अखंड भारत कसा जोडला गेला याची सुंदर रांगोळी काढलीया प्रसंगी आपल्या भाषणात डॉ. ए जी भंगाळे यांनी शिक्षणाने जर संस्कृती बिघडत असेल तर ती काही कामाची नाही. ज्येष्ठांनी एवढी वर्ष सेवा केली व आता आपण मुले म्हणून ज्येष्ठांचे संगोपन करण्यात पुढे आले पाहिजे.

अध्यक्ष भाषणात डॉ. उल्हास पाटील यांनी जेष्ठ नागरिकांच्या कार्याबद्दल व त्यांच्या या वयातील फिट राहण्याबद्दल कौतुक केले व रांगोळी स्पर्धे तील स्पर्धाकांच्या रांगोळ्या बघून लोहपुरुषांबद्दलचा असलेला अभिमान द्विगणित झाल्याचे त्यांनी सांगितले. सत्कारार्थी श्री दत्तात्रय तुकाराम चौधरी यांनी आपल्या मनोगतात नवीन पिढीने एकत्र येऊन सामाजिक कार्य करून कार्यक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व श्री पी के पाटील यांनी आपल्या मनोगतात सत्कार केल्याबद्दल कार्यक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत वारके यांनी केले व आभार डॉ. स्नेहल फेगडे यांनी मानले सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ललित महाजन, भूषण चौधरी, विलास नेहेते, निलेश चौधरी, महेश पाटील सर, एकनाथ पाचपांडे सर, डॉ. निलेश पाटील सर, विवेक महाजन, डॉ. निशिकांत भंगाळे, यतीन रोटे,भानुदास भोळे, काशिनाथ बऱ्हाटे, जगदीश फिरके, मनोज राणे ,आकाश भोळे, राजेश काळे उमेश खांबेटे अजय चौधरी, वरद दंडगव्हाळ, राहुल चौधरी सर, अजित चौधरी सर, नेमीचंद येवले, बंटी भोळे, नितीन बऱ्हाटे, रवींद्र भारंबे, सतीश चौधरी, नरेंद्र बोरसे, प्रफुल्ल सरोदे, सचिन महाजन, विजया चौधरी, अनुपमा कोल्हे, दीपनंदा पाटील, विजय नारखेडे तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात दिवाळी साजरी

जळगाव – गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, जळगाव येथे दिवाळी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी विविध रंगांच्या रांगोळ्यांनी परिसर सजवून, कंदील व दिव्यांच्या प्रकाशाने परिसर उजळवला. या सणाच्या निमित्ताने विद्यार्थिनींनी आपापली कला सादर करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. पारंपारिक वातावरणात लक्ष्मीपूजन करून दिवाळी सण साजरा करण्यात आला. सर्वांनी एकत्र येऊन आनंद घेतल्याने महाविद्यालयाचा परिसर दिवाळीच्या उत्साहाने भरून गेला.







# गोदावरी नर्सिंगमध्ये सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन

**जळगाव – आज गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात भारताचे लोहपुरुष आणि एकतेचे शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.**

यावेळी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, आणि विद्यार्थी उपस्थीत होते. कार्यक्रमाची सुरुवात सरदार पटेल यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या कार्याचा आढावा घेत भारताच्या एकतेसाठी त्यांच्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमात एकतेचे महत्त्व, सहकार्य, आणि समाजाची सेवा यावर चर्चा करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी सरदार पटेल यांच्या विचारांवर भाषणे सादर केली आणि त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करण्याची शपथ घेतली.

# यशोधाम स्कूलमध्ये ३५ दात्यांचे रक्तदान

स्थळ यशोधाम पब्लिक स्कूल,मलकापूर व गोदावरी फाउंडेशन जळगांव संयुक्त विद्यमाने.. रक्तदान शिबिराचे आयोजन, आयोजक.प्राचार्य. पी.उषा मॅडम, संदीप मुंढे, धीरज, चवरे, अरवा जोहर, अनुराधा चौधरी, चंदा मुंढे, ज्योती घिर्निकर, सुनिता चौधरी, अनिता साठे, जिशा पाटील, आशा सोळंके, वैशाली सपकाळे, संध्या वराडे, मृणाली सरागे, धनश्री आगलावे, प्रफुल वानखेडे, राजू भोंबे, अमोल सेकोकर, उमेश देशपांडे, योगेश गवळी, प्रवीण शिंदे., शिक्षक कर्मचारी, गाळी चालक ( स्कूल बस ड्रायव्हर ) रक्तदात्यांनी रक्तदान करूनु ३५ रक्तदात्यांचे रक्त संकलन करण्यात आले. गोदावरी फाउंडेशन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय रक्तपेढीचे. डॉ.नितीन भारंबे, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, राज तवर, भावेश शेळके यांनी परिश्रम घेतले.




# राइफल शूटिंग स्पर्धेत सिमरा खानला २ रजत पदक

**जळगांव– ११ वी पश्चिम विभागीय राइफल शूटिंग स्पर्धेत सिमराखान हिने २ रजत पदक प्राप्त करत यश मिळवले आहे.**

२१ ते २४ अक्तूबर २०२४ दरम्यान बालेवाड़ी, पुणे येथे संपन्न झाली. सदर स्पर्धेत जामनेरची सिमरा आसिफ खानने यूथ व जूनियर या दोन गटात ४०० पैकी ३९६ गुण प्राप्त करुन दूसरा क्रमांक (रजत पदक) पटकवले.

सिमरा खानच्या यशा बद्दल गोदावरी फॉउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, उपाध्यक्ष सुभाष पाटील, सचिव डॉ.वर्षा पाटील सदस्या डॉ. केतकीताई पाटील, डी एम कॉर्डीओलॉजीस्ट डॉ. वैभव पाटील, जामनेरचे आमदार मा. गिरीश महाजन, साधना महाजन व जामनेर नगरीचे सर्व नगरसेवक तसेच जिल्हा क्रीड़ा अधिकारी रविंद्र नाईक यांनी सिमरा खानचे अभिनंदन करुन स्वागत केले तसेच भविष्यात हेणारी राष्ट्रीय स्पर्धा साठी शुभेच्छा दिल्या.

सिमरा खानला दिलीप गवळी , नेहा सपते व प्रियंका पटायत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.सिमराखान ही गोदावरी फॉउंडेशनचे क्रिडा संचालक आसिफखान यांची मुलगी आहे.



Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

### गोदावरी सीबीएसई स्कूलमध्ये

# मुलांसाठी पोक्सो ॲक्टवर कार्यशाळा संपन्न



**जळगाव – गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूलमध्ये मुलांसाठी प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्सुअल ऑफेन्सेस ॲक्ट (पोक्सो ॲक्ट) वरती एक विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**

या कार्यशाळेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकारांचे ज्ञान देणे, त्यांचे संरक्षण आणि सुरक्षितता याबाबत जागरूकता निर्माण करणे होते. कार्यशाळेसाठी कायदा आणि समाजसेवा क्षेत्रातील तज्ञ ड.रवींद्र सिंग पाटील मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी पोक्सो ॲक्टच्या विविध बाबींचे सखोल मार्गदर्शन केले आणि मुलांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी कायद्याने दिलेले अधिकार समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना ॲक्टचे महत्त्व, त्यांचे हक्क आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेले उपाय याबद्दल माहिती देण्यात आली.कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि त्यांचे प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. शाळेच्या प्राचार्या नीलिमा चौधरी यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे महत्व पटवून दिले आणि याविषयी सजग राहण्याचा सल्ला दिला.कार्यशाळा विद्यार्थ्यांनी व उपस्थित सर्व शिक्षकांनी अत्यंत साकारात्मक प्रतिसादाने स्वीकारली तसेच त्यांना दिलेली माहिती उपयुक्त असल्याचे सांगितले.शाळेच्या प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी वचनबद्ध असल्याचे सांगितले आणि भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येईल अशा आश्वासन दिले.

या कार्यक्रमाला प्राचार्य सौ. निलीमा चौधरी सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेमवाणी

1. *Going above and beyond and living your best life is the ultimate goal.*
– ❋अपने आप को पूरी तरह से उत्कृष्ट बनाना और अपना सर्वश्रेष्ठ जीवन जीना ही अंतिम लक्ष्य है।❋
2. *Maintain an upbeat attitude about yourself and your goals.*
– ❋अपने आप को और अपने लक्ष्यों के बारे में एक सकारात्मक नजरिया बनाए रखें।❋
3. *Have pride in yourself and your work as you work towards being your personal best.*
– ❋अपने व्यक्तिगत श्रेष्ठ बनने की दिशा में काम करते समय अपने आप पर और अपने काम पर गर्व करें।❋

# गोदावरी परिवारात दीपोत्सव हर्षोल्हासात

**गोदावरी फाऊंडेशनच्या विविध संस्थांमध्ये दीपावली महोत्सव हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. यामध्ये गोदावरी लक्ष्मी को.-ऑप. बँक लिमिटेड, गोदावरी नर्सिंग महाविद्यालय, गोदावरी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अन्नपूर्णालयम, इंजिनिअरिंग कॉलेज, गोदावरी हॉस्पिटल भास्कर मार्केट जळगाव आदि ठिकाणी साजरा झाला.**





















# शरिरावर प्रभाव पाडणाऱ्या त्वचाविकारांकडे दूर्लक्ष करू नका

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील त्वचा विकार तज्ज्ञांचा घ्या सल्ला

**जळगाव – त्वचेचे रोग सौम्य आणि तात्पुरत्या स्थितीपासून ते जुनाट आणि दुर्बल करणाऱ्या विकारांपर्यंत असतात. हे लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्व वयोगटातील व्यक्तींना प्रभावित करते आणि एखाद्या व्यक्तीच्या शारीरिक आणि भावनिक आरोग्यावर त्याचा जोरदार प्रभाव पडतो. तुम्हाला त्वचेची लक्षणे जाणवत असल्यास, योग्य निदान आणि योग्य उपचारांसाठी त्वरीत डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील त्वचा विकार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**

त्वचेच्या आजाराला त्वचाविज्ञान विकार असेही म्हणतात किंवा त्वचाविकार म्हणजे त्वचा, केस, नखे किंवा श्लेष्मल त्वचा प्रभावित करणारी कोणतीही स्थिती. त्वचेचे रोग विविध मार्गांनी प्रकट होतात ज्यात त्वचेचा रंग, पोत, देखावा आणि एकूण कार्यामध्ये बदल समाविष्ट असतात. हे रोग अनुवांशिकता, संक्रमण, ऍलर्जी, स्वयंप्रतिकार प्रतिक्रिया, पर्यावरणीय घटक आणि इतर कोणत्याही अंतर्निहित वैद्यकीय परिस्थितींसारख्या असंख्य घटकांचे परिणाम असू शकतात.



**त्वचाविकार कोणते?**

मुरुम: मुरुम, ब्लॅकहेड्स, व्हाईटहेड्स आणि जळजळ द्वारे निर्धारित त्वचेची स्थिती. एक्जिमा: त्वचारोग म्हणूनही ओळखले जाते, याला अशा स्थितींचा समूह म्हणून संबोधले जाते ज्यामुळे त्वचा कोरडी, खाज सुटते आणि सूज येते. सोरायसिस: हा एक क्रॉनिक ऑटोइम्यून रोग आहे ज्यामुळे त्वचेच्या पेशी वेगाने तयार होतात, ज्यामुळे जाड आणि खवले चट्टे तयार होतात.

**रोसेशिया :** त्वचेची तीव्र दाहक स्थिती जी चेहऱ्यावर परिणाम करते ज्यामुळे लालसरपणा, लालसरपणा आणि रक्तवाहिन्या दिसतात. **त्वचारोग:** ही एक त्वचेची जळजळ आहे जी चिडचिडे (संपर्क त्वचारोग) किंवा ऍलर्जी (लर्जीक त्वचारोग) यांच्याशी संपर्क यासारख्या अनेक कारणांमुळे होते.

**त्वचारोग:** ही एक स्थिती आहे जी त्वचेच्या काही भागात रंगद्रव्य कमी झाल्यामुळे पांढरे चट्टे पडतात. बुरशीजन्य संसर्ग: हे संक्रमण बुरशीमुळे होतात आणि दाद, ऍथलीटचे पाय किंवा यीस्ट संसर्ग यांसारख्या परिस्थितीस कारणीभूत ठरतात.

**जिवाणू संक्रमण:** हे स्टॅफिलोकोकस किंवा स्ट्रेप्टोकोकस बॅक्टेरियामुळे होते आणि याला सेल्युलाईटिस म्हणून देखील ओळखले जाते जे त्वचेचे खोलवरचे संक्रमण आहे. व्हायरल इन्फेक्शन्स: यामुळे थंड फोड, दाद किंवा मस्से (ह्युमन पॅपिलोमाव्हायरस) सारख्या त्वचेच्या स्थिती निर्माण होतात.

त्वचा विकारांकडे आपण फारसे गांभीर्याने लक्ष देत नाही. कालांतराने हे विकार वाढून त्याचा शारिरीक प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवतो. मग त्यानंतर आपण उपचारासाठी धावपळ करतो. परंतु लक्षणे दिसू लागल्यावर तातडीने त्वचा विकार तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास या विकारांवर मात करता येते.



–डॉ.तेजस्वीनी फाटे
निवासी डॉक्टर

# १० रक्त चाचण्या प्रत्येकाने विचारात घेतल्या पाहिजेत

**जळगाव –** एखाद्या व्यक्तीच्या आरोग्याचे विश्लेषण करण्यासाठी आणि रोग आणि विकृतींचे निदान करण्यासाठी हेल्थकेअरमध्ये वापरल्या जाणाऱ्या रक्त चाचण्या ही आवश्यक निदान साधने आहेत. विविध रक्त चाचण्या शरीराच्या विविध पैलूंचे मूल्यांकन करतात. संपूर्ण रक्त गणना (सीबीसी) पासून ते लिपिड प्रोफाइल पर्यंतचे हे निदान आरोग्यविषयक संकेत दर्शवतात.रक्त चाचणी म्हणजे काय हे समजून घेऊ आणि नंतर तुमचे डॉक्टर तुम्हाला कोणत्या प्रकारच्या रक्त चाचण्या सुचवू शकतात.

### रक्त तपासणी म्हणजे काय?

रक्ताच्या चाचण्या ही एकतर नियमित तपासणी दरम्यान किंवा तुम्हाला आढळणाऱ्या चिन्हे आणि लक्षणांवरून निदान करण्यासाठी केलेल्या वैद्यकीय तपासण्या आहेत. त्यामध्ये रक्तातील पेशी, प्लेटलेट्स, इलेक्ट्रोलाइट्स, प्रथिने, हार्मोन्स आणि खनिजांच्या तपासणीसह सामान्य रक्त चाचण्यांचा समावेश होतो.रक्त चाचण्या आरोग्य समस्यांचे निदान करण्यात मदत करत असताना, पुढील तपासासाठी ते मौल्यवान साधने आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या रक्त चाचण्या तुमच्या आरोग्याविषयी भरपूर माहिती देतात, ज्यामुळे ते सामान्यतः वापरले जाणारे वैद्यकीय साधन बनतात. या चाचण्या जसे की (सीबीसी) आणि चयापचय पॅनेल, आरोग्य स्थितीचे निदान करण्यात मदत करतात, स्थिती लवकर ओळखणे सुनिश्चित करतात, अनुकूल उपचारांचे नियोजन करतात आणि संभाव्य आरोग्य धोक्यांचे व्यवस्थापन सुधारतात.

### १० सर्वात सामान्य आणि महत्त्वपूर्ण प्रकारच्या रक्त चाचण्या

सीबीसी चाचणी, बेसिक मेटाबॉलिक पॅनल (बीएमपी) चाचणी, ग्लुकोज (मुख्य ऊर्जा स्त्रोत), व्यापक मेटाबॉलिक पॅनेल (सीएमपी), लिपिड पॅनेल, थायरॉईड पॅनेल, कार्डियाक बायोमार्कर्स, लैंगिक संक्रमित संसर्ग चाचण्या, कोग्युलेशन चाचणी, डिहायड्रोएपियान्ड्रोस्टेरॉन सल्फेट चाचणी, सी-रिक्टिव्ह प्रोटीन (सीआरपी) चाचणी, वेगवेगळ्या प्रकारच्या रक्त चाचण्यांचे परिणाम समजून घेण्यासाठी, तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे चांगले.




# लघवीच्या गडद रंगाला गांभीर्याने घ्या!

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञांच्या घ्या आजच सल्ला

**जळगाव –** मूत्राचा रंग सामान्यतः स्पष्ट ते हलका पिवळा रंग असतो. पिवळे रंगद्रव्य, ज्याला युरोबिलिन किंवा युरोक्रोम असेही म्हणतात, नैसर्गिकरित्या मूत्रात असते. तथापि, जेव्हा शरीरात बदल होतात तेव्हा ते गडद पिवळे मूत्र कारणीभूत ठरते. डिहायड्रेशन हे गडद पिवळ्या मूत्राचे सर्वात सामान्य कारण आहे. काहीवेळा, हे काहीतरी असामान्य किंवा हानिकारक असे लक्षण असू शकते कावीळ, संक्रमण किंवा इतर आरोग्य समस्यामूळे देखिल लघवीचा रंग बदलू शकतो.

बऱ्याच वैद्यकीय परिस्थितींमुळे तुमच्या लघवीचा रंग बदलतो किंवा वेगळा दिसू लागतो. त्यापैकी काही आहेत: लाल रंगाचे लघवी हे मूत्रमार्गाच्या संसर्गाचे (यूटीआय) , किडनी



स्टोन किंवा क्वचित प्रसंगी कर्करोगाचे लक्षण असू शकते .लालसर जांभळा मूत्र हे शिसे किंवा पाराच्या विषबाधाचे लक्षण असू शकते .

कोला- किंवा चहाच्या रंगाचे लघवी किंवा वास येणारा लघवी हे किडनीच्या आजाराचे लक्षण असू शकते. केशरी रंगाचे लघवी हे तुमच्या यकृत किंवा पित्त नलिकाच्या समस्यांचे लक्षण असू शकते .हिरवट किंवा ढगाळ लघवी हे युटीआय चे लक्षण असू शकते. गडद तपकिरी लघवी किंवा अमोनियासारखा वास येणारा लघवी यकृत निकामी होण्याचे लक्षण असू शकते .गोड वास असलेले लघवी हे मधुमेहाचे लक्षण असू शकते .

वास असलेले लघवी हे चयापचय विकाराचे लक्षण असू शकते . ही लक्षणे काही दिवसांपेक्षा जास्त काळ टिकून राहिल्यास, विशेषत: लघवी करताना जळजळ, ताप/थंडी, अस्पष्ट थकवा किंवा वेदना यांसारख्या इतर लक्षणांसह एकत्रितपणे आढळल्यास, तुम्ही तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधणे गरजेचे आहे

# अपेंडिसाइटिस म्हणजे काय?

**जळगाव –** अपेंडिक्स हा एक लहान, बोटांसारखा अवयव आहे. हे पोटाच्या खालच्या उजव्या बाजूला असलेल्या नळीच्या आकाराच्या थैलीसारखे दिसते. द परिशिष्ट मोठ्या आतड्याला जोडलेले असते आणि कोलनवर असते.

अपेंडिसाइटिस म्हणजे काय?

खालच्या भागांच्या उजव्या बाजूला तुमच्या अपेंडिक्सच्या भागात वेदना होत असल्यास, ते वेगवेगळ्या कारणांमुळे असू शकते. त्यापैकी सर्वात सामान्य म्हणजे ॲपेन्डिसाइटिस. जर अपेंडिक्स फुगले असेल, संक्रमित झाले असेल आणि ब्लॉक केले असेल तर ते अपेंडिसाइटिस नावाच्या वेदनादायक स्थितीस कारणीभूत ठरू शकते.

अपेंडिक्समध्ये वेदना सामान्य कारणे

पचनमार्गात बॅक्टेरिया, विषाणू किंवा परजीवींची उपस्थिती.अपेंडिक्समध्ये गुदमरल्या जाणार्या स्टूलमध्ये अडथळा येतो.अपेंडिक्सभोवती पू किंवा गळू.

**अपेंडिसाइटिसची चिन्हे आणि लक्षणे**

अपेंडिसायटिसच्या सामान्य लक्षणांमध्ये पोटाच्या बटणाभोवती मंद दुखणे हे अपेंडिक्स असलेल्या ठिकाणी हलते. हे




खालच्या पोटाच्या उजव्या बाजूला देखील सुरू होऊ शकते. तुम्ही हालचाल करता, खोकता, शिंकता, खोल श्वास घेता किंवा त्या भागाला स्पर्श करता तेव्हा जास्त त्रास होतो.ॲपेंडिसाइटिसमुळे अनेकदा तीव्र वेदना होतात. जेव्हा मल अपेंडिक्सवर परिणाम करते, तेव्हा लक्षणे आणखी वाईट होऊ लागतात आणि अपेंडिक्स फुटू शकतात. अपेंडिक्सच्या भिंती तुटल्यास किंवा त्यात छिद्रे असल्यास, त्यातून संसर्ग, श्लेष्मा किंवा मल गळतो आणि पोटात पसरतो कारण अपेंडिक्स मरण्यास सुरवात होते. ही स्थिती पेरिटोनिटिस म्हणून ओळखली जाते आणि हा एक गंभीर प्रकारचा संसर्ग आहे. अपेंडिक्स फुटल्यास पोटभर वेदना जाणवतात. उपचार न केल्यास ते ४८-७२ तासांत फुटू शकते. इतर लक्षणांमध्ये खालील गोष्टींचा समावेश असू शकतो: उलट्या,ताप,अपचन,मळमळ आणि / किंवा उलट्या,ओटीपोटात सूज,बद्धकोष्ठता, अतिसार, गॅस पास करताना किंवा खूप गॅस पास करताना त्रास होतो,भूक न लागणे,लघवी करताना वेदना, गुदाशय, पाठ किंवा पोटाच्या इतर भागात वेदना. जर लक्षणे सूचित करतात की आपल्याला ॲपेन्डिसाइटिस आहे, **तर आपण ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.**

# जिल्ह्यातील ११ मतदारसंघासाठी १३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

विधानसभा निवडणूक २०२४

**※ सर्वाधिक २९ उमेदवार जळगाव शहर मतदार संघात तर**

**※ सर्वात कमी प्रत्येकी ८ उमेदवार चाळीसगांव मतदार संघात**

**※ जळगाव जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीच्या रिंगणातून ९२ उमेदवारांची माघार**

**जळगाव – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता जिल्ह्यात नामनिर्देशनपत्र दाखल केलेल्या २३१ उमेदवारीपैकी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या आजच्या दि.४ नोव्हेंबर शेवटच्या दिवशी जिल्ह्यातील ९२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे आता जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदार मतदार संघासाठी एकूण १३९ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात राहिले आहेत. अशी माहिती निवडणूक शाखेमार्फत प्राप्त झाली आहे.**

विधानसभा मतदार संघनिहाय निवडणूकीच्या रिंगणातील उमेदवारांची



संख्या (कंसात माघार घेतलेल्य उमेदवारांची संख्या)

चोपडा-९ (७) रावेर-९ (१४), भुसावळ-९ (७) जळगाव शहर-२९ (८) जळगाव ग्रामीण-११ (६) अमळनेर-१२(४), एरंडोल-१३ (०७) ,चाळीसगाव-८ (८) पाचोरा-१२ (१२) जामनेर-१०(१२)मुक्ताईनगर-७ (१७) याप्रमाणे आहे.

सोमवार दि.४ नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत जिल्ह्यातील एकूण ११ विधानसभा मतदार संघात २३१ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते . दरम्यान मघारीच्या अंतिम दिवशी एकूण ९२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने आता जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदार संघात १३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# विधानसभा निवडणुकी दरम्यान काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी आयकर विभागातर्फे जनतेला आवाहन

**जळगाव – महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम नुकताच जाहीर करण्यात आला आहे.**

यानुसार महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचे मतदान २० नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे. यासाठी उमेदवारांनी आपल्या मतदार संघातील निवडणूकीसाठी अर्ज जमा केले आहे. उमेदवार आपला प्रचार करण्यासाठी मैदानात उतरले आहेत. मात्र निवडणुकीवेळी पैशांचे अनेक गैरव्यवहार घडत असतात. त्यामुळे निवडणुकीत काळा पैसा वापरला जात असेल तर लवकरात लवकर प्राप्तिकर विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन उप आयकर निदेशक अनिल खडसे यांनी केले आहे.

एक परिपत्रक प्रसिद्ध करत विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ दरम्यान काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी प्राप्तिकर विभागाशी सहकार्य करावे असे आवाहन आयकर विभागातर्फे करण्यात आले आहे. या निवडणुकीत काळा पैसा वापरला जात असल्याची माहिती, रोख रकमेचे वाटप, रोख रकमेची हालचाल याबाबत विश्वसनीय माहिती देण्यास संकोच करू नये अशी विनंती करण्यात आली आहे. महत्वाची बाब म्हणजे माहिती देणाऱ्यांची ओळख गुप्त ठेवण्यात येणार आहे.

जर कुणाला याबाबत माहिती द्यावयची असेल तर त्यांनी टोल फ्री नंबर : १८००-२३३-०३५५, व्हॉट्सॲप क्रमांक : ९४०३३९०९८० (छायाचित्रे, व्हिडिओ इत्यादी पाठविण्यासाठी) किंवा .nagpur. addidit.invincometax.gov.in, nashik.addidit.invincometax.gov.in या ईमेल वर मेल करावा, असे आवाहन जनतेला करण्यात आले आहे.